## नगरपालिका निकायांकडून माहिती मिळवण्यासाठी माहितीचा अधिकार कसा वापरावा

<u>शब्दावली</u>

- **केंद्रीय माहिती आयोग**:- माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. केंद्रीय माहिती आयोग हे केंद्र सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.
- **माहिती**:- कलम २(च) अन्वये कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापणे, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.
- **सार्वजनिक प्राधिकरण**:- कलम २(ज) अन्वये याचा अर्थ, --

    (क) संविधानाद्वारे किंवा तदन्वये;

    (ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

    (ग) राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

    (घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,

    (एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;

    (दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी आशासकीय संघटना, यांचा समावेश होतो.

(१) **माहितीचा अधिकार**:- कलम २(ञ) अन्वये याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये, -

(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे;

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे;

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे;

(चार) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हिडिओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंटआऊट) मार्फत माहिती मिळवणे; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो.

(२) **राज्य माहिती आयोग**:- माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ट) अन्वये व्याख्या. राज्य माहिती आयोग हे राज्य सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.

(१) **पार्श्वभूमी**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उद्देश सार्वजनिक प्राधिकरणांकडून मागवलेली माहिती मिळवून देणे असा आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २ (च) अन्वये माहितीची व्याख्या करण्यात आलेली आहे तर कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण याची व्याख्या करण्यात आलेली आहे. संबंधित कलमे खाली पुनरुक्त केलेली आहेत:-

***कलम २(च)***:- *'माहिती' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापणे, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.*

**कलम** २(**ज**):- 'सार्वजनिक प्राधिकरण' याचा अर्थ, --

अ. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;

आ. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

इ. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

ई. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,
(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;
(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना, यांचा समावेश होतो

(२) **नगरपालिका निकाय सार्वजनिक प्राधिकरण आहेत काय?**

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३(थ) अन्वये प्रत्येक राज्याने शहरी भागात तीन प्रकारच्या नगरपालिका निकाय स्थापन करणे आवश्यक आहे. त्यामुळे नगरपालिका निकाय अधिनियमाच्या कलम २(ज)(क) अन्वये केलेल्या सार्वजनिक प्राधिकरणे या व्याख्येखाली येतात.

नगरपालिका निकायांची वर्गवारी तीन शीर्षकाखाली होते:-

नगरपालिका निकायांचे प्रकार

नगरपालिका | महानगर पालिका | नगर पंचायत

त्यांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे:-

अ ) नगरपालिका:- लहान शहरी भागासाठी नगरपालिका स्थापन केली जाते; आणि

ब) महानगरपालिका:- महानगरपालिका मोठ्या शहरी भागासाठी स्थापन केली जाते

क) नगर पंचायत:- नगर पंचायत स्थित्यंतर होत असलेल्या भागातच स्थापन करणे आवश्यक आहे.

अनुच्छेद २४३ब संविधानाच्या तरतुदींच्या अधीन राहून राज्यांची विधानमंडळे नगरपालिका, इत्यादींना कायद्याद्वारे कोणते अधिकार, प्राधिकार आणि जबाबदाऱ्या देऊ शकते याबाबत आहे. त्याशिवाय नगरपालिका निकायांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ४ चे पालन करणे आवश्यक आहे. या कलमानुसार नगरपालिका निकायांची पुढील दायित्वे आहेत:-

*४(१) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, –*

*(क) सर्व अभिलेख योग्य रीतीने सूचिबद्ध करील आणि त्याची निर्देशसूची तयार करील*

*(ख) हा अधिनियम झाल्यापासून एकशेवीस दिवसांच्या आत, –*

*(एक) आपली रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील;*

*(दोन) आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये;*

*(तीन) निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली;*

*(चार) स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके;*

*(पाच) त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख;*

*(सहा) त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण;*

*(सात) आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील;*

*(आठ) आपल्या एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण; आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी*

*लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण;*

*(नऊ) आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका;*

*(दहा) आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन; तसेच प्राधिकरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पद्धती;*

*(अकरा) सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि सावितरित केलेल्या रकमांचा अहवाल;*

*(बारा) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशील;*

*माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील;*

*(सोळा) जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनाम आणि इतर तपशील;*

*(सतरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती;*

*प्रसिद्ध करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशाने अद्ययावत करील;*

*(ग) ज्यामुळे लोकांना बाधा पोहोचते अशी महत्वाची धोरणे आखताना आणि असे निर्णय जाहीर करताना सर्व संबंधित वस्तुस्थिती प्रसिद्ध करील;*

*(घ) आपल्या प्रशासनिक किंवा न्यायिकवत निर्णयांबाबतची कारणे बाधित व्यक्तींना कळवील.*

नगरपालिका निकायांनी खालील कलमानुसार जन माहिती अधिकारी पदनिर्देशित करणे आवश्यक आहे:-

*कलम ५(१):- प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून शंभर दिवाणसांच्या आत या अधिनियमान्वये माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींना माहिती देण्यासाठी, त्याच्या अखत्यारीतील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढ्या जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना, यथास्थिती, केंद्रीय जण माहिती अधिकारी किंवा राज्य जण माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील.*

(३) **कार्यक्षेत्र**

अनुच्छेद २४३ अन्वये:- अनुच्छेद २४३ - पंचायतींचे अधिकार, प्राधिकार आणि जबाबदाऱ्या इत्यादी - या संविधानाच्या तरतुदींना अधीन राहून, राज्य विधिमंडळ, कायद्याद्वारे

(क) पंचायतींना स्वराज्य संस्था म्हणून कामे पार पाडणे शक्य व्हावे, या दृष्टीने त्यांना आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार देऊ शकेल आणि अश्या कायद्यात पंचायतींच्या अधिकार आणि प्राधिकार यांच्या संदर्भात, या कायद्यामध्ये विनिर्दिष्ट करता येतील अशा शर्तींच्या अधीन राहून, -

(१) आर्थिक विकास व सामाजिक न्याय यांसाठी योजना तयार करण्याच्या;

(२) बाराव्या अनुसूचीमध्ये सूचिबद्ध केलेल्या बाबींच्या संबंधातील योजनांसहित त्यांच्याकडे सोपविण्यात येतील अशा, कार्ये आणि योजनांची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत;

(ख) बाराव्या अनुसूचीमध्ये सूचिबद्ध केलेल्या बाबींच्या संदर्भात त्यांच्यावर सोपवलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आवश्यकतेनुसार असे अधिकार आणि प्राधिकार असलेल्या समित्या स्थापन करण्यासाठीच्या तरतुदींचा अशा कायद्यामध्ये अंतर्भाव करू शकेल.

नगरपालिका संस्थांची महत्वाची कार्यक्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत:-

अ) पाणीपुरवठा, स्वच्छता, साफसफाई, रस्ते, निस्सारण, रस्त्यांचे विद्युतीकरण

ब) उद्याने, सार्वजनिक सुविधा, दफनभूमी

क) भूमीचा वापर, नगर नियोजन, बांधकामविषयक कार्यकलाप, व्यापार नियंत्रण यासारखी नियोजनात्मक कार्ये

ड) आर्थिक आणि सामाजिक विकास व झोपडपट्टी सुधार, नागरी गरीबी उच्चाटन, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सौंदर्यात्मक बाबी अशी सामाजिक-आर्थिक कार्ये

इ) वेगवेगळया शासकीय योजनांची तृणमूल पातळीवर अंमलबजावणी

माहितीच्या अधिकाराद्वारे मोठ्या प्रमाणात पुढील माहिती मागवली जाते:-

अ) अंदाजपत्रकीय तरतूद आणि अपेक्षित उत्पन्नाचा अंदाज

ब) हाती घेतली जाणारी देखभालीचे कामे

क) ठेकेदारांची यादी

ड) वेगवेगळया प्रकल्पांसाठी बोली लावणाऱ्यांची यादी

ई ) आर्थिक तरतूद

फ) वेगवेगळया योजनांच्या लाभार्थींची यादी

ग) शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी

ह) अधिकाऱ्यांची निर्देशिका

इ)निर्णय प्रक्रिया

**(४) स्थानिक संस्थांकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल्स**

राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि जिल्ह्यांच्या स्थानिक संस्थांच्या ऑनलाइन पोर्टल्सच्या लिंक्स खालील तक्त्यात दिल्या आहेत:-

| | |
|---|---|
| हरयाणा | https://www.filertionline.in/how-to-file-rti-in-urban-local%20bodies-haryana-in-haryana |
| कोइंबतुर | https://coimbatore.nic.in/rti/ |

| | |
|---|---|
| कोझिकोडे | https://kozhikodecorporation.lsgkerala.gov.in/en/RTI |
| ओरिसा | https://rtiodisha.gov.in/pa/T1RILzEzLzc3MS8xMQ |
| विल्लुपुरम जिल्हा | https://viluppuram.nic.in/rti/ |
| कोलकत्ता | https://www.kmcgov.in/KMCPortal/jsp/AppellateAuthorities.jsp |
| चंदिगड केंद्रशासित प्रदेश | http://mcchandigarh.gov.in/?q=rti-branch |
| पंजाब | http://lgpunjab.gov.in/cms/rti.php |

## (५) ताज्या घडामोडी

माहितीचा अधिकार आणि स्थानिक संस्था या संदर्भातील काही ताज्या घडामोडी पुढे दिल्या आहेत:-

अ. सन २०१९ मध्ये माहितीच्या अधिकारामुळे बिजनोरच्या रहिवाशांना विकासकामातील त्रुटी आणि अफरातफर व आर्थिक भ्रष्टाचार शोधण्यासाठी सहाय्य झाले.

आ. अंकित जैन या माहिती अधिकार कार्यकर्त्याच्या प्रयत्नांमुळे डेराबस्सीच्या स्थानिक संस्थेस बेकायदा बांधकाम केलेल्या ४ इमारती सील कराव्या लागल्या.

इ. राहुल शर्मा विरुद्ध सार्वजनिक बांधकाम खाते दिल्ली (२०१८) या प्रकरणात सार्वजनिक माहितीच्या विकासासाठी माहितीचा मुक्त देवाणघेवाण होण्याच्या दृष्टीने आदेश जरी केले. त्यातील संबंधित भाग पुढीलप्रमाणे:-

*"माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम १९(८)(अ)(*चार) *अन्वये विहित शक्तींचा वापर करत, हा आयोग संबंधित खाते तसेच केंद्रीय बांधकाम विभाग, भारत सरकारचे शहर विकास मंत्रालय यांना ठेकेदारांनी सादर केलेल्या सामग्री खरेदीच्या बाबीवार बिलांची माहिती/ अभिलेख राखून ठेवण्याच्या पद्धतींमध्ये पुरेसे बदल करण्याचे आदेश देत आहे. कार्य प्रदान करारात काहीही शर्ती असल्या तरी, प्रत्येक प्रकरणामध्ये बांधकाम खाते, जीएनसीटीडी आणि केंद्रीय बांधकाम विभाग यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संस्था/ ठेकेदारांकडून पैसे अदा करण्यापूर्वी बाबीवार बिलांच्या प्राधिकृत प्रती अभिलेखावर जमा करून घेणे अनिवार्य असेल. सार्वजनिक प्राधिकरणांनी गतिमान शासनाच्या तत्वाचे उल्लंघन घटवण्यासाठी आणि कार्यकारी कार्यामध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी अशा पद्धती स्वेच्छेने अवलंबणे ही काळाची गरज आहे.*

ई. सन २०१३ मध्ये केंद्रीय माहिती आयुक्त श्री शैलेश गांधी यांनी मागितलेली माहिती पुरवण्यात १०० दिवसांहून जास्त विलंब केल्यासाठी सहा स्वच्छता पर्यवेक्षकांना दंडाची शिक्षा ठोठावली.

*<u>माहितीच्या अधिकाराखालील नमुना अर्ज</u>*

३१ ऑक्टोबर, २०२१

प्रति,
जन माहिती अधिकारी,
महानगरपालिका
नवी दिल्ली, भारत

महोदय/ महोदया,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये पुढील माहिती मागवण्यात येत आहे. कृपया पुढील माहिती पुरवावी:-

(१) दिल्लीमधील रस्त्यांवरील दिव्यांची संख्या.
(२) रस्त्यांवरील दिव्यांच्या देखभालीचे कार्य ज्यांना सोपवले आहे अशा ठेकेदारांची यादी.
(३) महानगरपालिका आणि ठेकेदारांमधील सह्या केलेल्या कराराची प्रत.
(४) रस्त्यांवरील दिव्यांसाठी केलेली अंदाजपत्रकीय तरतूद.
(५) ज्या कालावधीत रस्त्यावरील दिवे चालू केले जातात त्याचे तपशील.

आपला,
यक्षज्ञ

**अर्ज निकाली काढण्यापूर्वी कृपया या बाबी विचारात घ्याव्यात:-**

१. आवश्यक असल्यास, कृपया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(३) अन्वये माहिती मिळवण्यास *'रास्त सहकार्य करावे'*.

२. माहिती पूर्णतः किंवा अंशतः कोणत्याही अन्य विशिष्ठ खात्याकडे उपलब्ध असल्यास, कृपया कलम ६(३) अन्वये अर्ज, अंशतः किंवा पूर्णतः, संबंधित खात्याकडे अंतरित करावा.